**विशेष दिवाणी मुकदमा नं. ६८/२०१२ नि. ३४१ वरील आदेश**

**(सुर्यकांत सुतार वि. शरद जाधव)**

**(CNR N0.MHSN020007952012)**

१. वादी यांनी निशाणी क्रमांक १५६/१ कडील दस्त शाबीत झालेला आहे असे प्रतिपादन करुन त्याला निशाणी क्रमांक देण्यात यावी अशी मागणी प्रस्तुत अर्जाद्वारे केलेली आहे.

२. वादींच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्रमांक ५ व ६ आणि प्रतिवादी क्रमांक ७ व ८ यांनी त्यांच्या अनुक्रमे निशाणी क्रमांक ११३ व ११४ कडील कैफियतीमध्ये दिनांक ०२/०६/२०११ रोजीचे निशाणी क्रमांक १५६/१ कडील करारपत्र झालेले आहे हे मान्य केलेले आहे. त्यामुळे सदरहु करारदस्त हा भारतीय पुरावा कायदयाप्रमाणे proved documents असे म्हणुन निशाणी क्रमांक देण्यात यावी अशी वादी यांनी मागणी केलेली आहे.

३. सदरहु अर्जाला अनुषंगून प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर त्यांचे विस्तृत म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दाखल कागदपत्राची झेरॉक्स कॉपी आहेत. त्यामुळे ते कागदपत्र शाबीत झाल्याखेरीज त्यांचा विचार करता येणार नाही. सबब त्यांनी वादींचा अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

४. सदरहु अर्जाला अनुषंगून मुळ दाव्याचे अवलोकन केले. वादी यांनी मुळ दावा खरेदीपत्र रद्द होवुन मिळण्यासाठी, निरंतर ताकीदीकरीता, वैकल्पीकरित्या कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

५. सदरहु अर्जाचा गुणदोषावर ऊहापोह करण्यापुर्वी, अत्यंत महत्वपुर्ण बाब म्हणजे, सदरहु दावा हा वेळोवेळी मा.जिल्हा न्यायालय यांनी Time bound केलेला आहे. प्रस्तुतचा दावा हा दिनांक २१/०३/२०१२ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. सदरचा दावा हा ११ वर्षे इतका जुना आहे.

६. वादी यांनी दिनांक ३१/०१/२०२२ रोजी निशाणी क्रमांक ३१८ कडे पुरसीस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केलेला होता. त्यानंतर सदरहु प्रकरणामध्ये प्रतिवादी यांचा साक्षीपुरावा दिनांक ३१/१०/२०२३ रोजी पुर्णपणे संपला. त्यामुळे त्याचदिवशी प्रकरण अंतिम युक्तिवादासाठी लागण्याची स्टेज असताना वादी यांनी प्रस्तुतचा वर नमुद कागदपत्रांना निशाणी देण्याचा अर्ज दिलेला आहे.

७. अर्जाला अनुषंगून उभय बाजुंचा युक्तिवाद ऐकला. निशाणी क्रमांक १५६/१ या कागदपत्राचे अवलोकन केले. सदरहु कागदपत्र हा झेरॉक्स स्वरुपाचा आहे. परंतु, अशी परिस्थिती असताना सदरहु कागदपत्राला दुय्यम पुरावा म्हणुन पुराव्यामध्ये वाचण्यात यावा असे प्रतिपादन वादी यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये का केले नाही ? याचे समाधानकारक स्पष्टीकरण वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये कोठेही केले नाही.

८. अत्यंत गंभीर बाब म्हणजे, वादी यांचा पुरावा दिनांक ३१/०१/२०२२ रोजी संपलेला आहे अशा आशयाची पुरसीस देताना संबंधीत कागदपत्रांना निशाणी क्रमांक दिलेली नाहीत ही बाब वादी यांनी का विचारात घेतली नाही ? अगर त्या गोष्टीकडे त्यांचे कसे दुर्लक्ष झाले ? याबाबतदेखील समाधानकारक खुलासा वादी यांनी त्यांच्या अर्जात कोठेही केलेला नाही.

९. सदरहु दावा हा ११ वर्षे जुना आहे व आता अंतिम युक्तिवादासाठी प्रस्तुतचा अर्ज निकाली केल्यानंतर नेमला जाणार आहे. त्या Flag end स्टेजला अर्जात नमुद केलेल्या कागदपत्राला proved documents म्हणुन निशाणी क्रमांक देण्यात यावी अशी मागणी वादी यांनी केलेली आहे.

१०. निशाणी क्रमांक १५६/१ या कागदपत्राचे अवलोकन केले. सदरहु कागदपत्र हा झेरॉक्स दस्त आहे. परंतु, प्रतिवादी वकीलांनी सदरहु कागदपत्राला आर्टीकल देण्यास हरकत नाही असे युक्तिवादादरम्यान तोंडी प्रतिपादन केले. त्यामुळे निशाणी क्रमांक १५६/१ कडील दस्ताला आर्टीकल क्रमांक दिल्यास कोणावरही अन्याय होणार नाही. सबब, वादी यांचा अर्ज अंशतः मंजुर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब, आदेश खालीलप्रमाणे –

## आदेश

१. वादी यांचा नि.क्र. ३४१ कडील अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. निशाणी क्रमांक १५६/१ कडील दस्ताला proved documents म्हणुन निशाणी क्रमांक देण्याची वादीची मागणी फेटाळण्यात येत आहे.

३. निशाणी क्रमांक १५६/१ कडील दस्ताला आर्टीकल E देण्यात येत आहे.

४. सदरहु केस ही मा. जिल्हा न्यायालय यांनी Time bound केलेली आहे, तसेच ती आता अंतिम युक्तिवादाकरीता नेमण्यात आलेली आहे, त्यामुळे उभय पक्षकारांनी कोणतीही तारीख न घेता सदरहु केसमध्ये विनाखंड युक्तिवाद करावा असे त्यांना निर्देशित करण्यात येत आहे.

५. अर्जाचे स्वरुप पाहता खर्चाबद्दल आदेश नाही.

६. उभय पक्षकारांनी हुकूमाची नोंद घ्यावी.

Abhay Ashok Mehendale Digitally signed by Abhay Ashok Mehendale Date: 2023.12.02 17:23:23 +0530

**सांगली.** **(अभय अ. मेहेंदळे)**

**दिनांकः ०२/१२/२०२३** **दुसरे सह–दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, सांगली.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | श्रीमती आर.व्ही.जाधव, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | ०२/१२/२०२३ |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक | - | ०२/१२/२०२३ |